# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.10.2025** **वार:सोमवार**

1. अतिवृष्टी, पूरग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत केंद्राकडून राज्याला दीड हजार कोटी रुपयांचा अग्रीम हप्ता जारी
2. दीपावलीनिमित्त अयोध्येत शरयू नदी किनारी भव्य, विक्रमी दीपोत्सव
3. राज्यातही दिवाळीचा उत्साह; सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांची रेलचेल
4. चांद्रयान-दोननं पहिल्यांदाच टिपला; सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या 'कोरोनल मास इजेक्शन'चा प्रभाव आणि
5. क्रिकेटमध्ये पन्नास षटकांच्या सामन्यांमध्ये, पुरुष संघाचा ऑस्ट्रेलियाकडून तर महिला संघाचा इंग्लंडकडून पराभव

**अमित शहा**

केंद्रीय गृह आणि सहकारिता मंत्री अमित शाह यांनी आर्थिक वर्ष 2025-26 साठी महाराष्ट्र राज्याला राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत केंद्राच्या हिस्स्याचा दुसरा हप्ता म्हणून 1 हजार 566 कोटी 40 लाख रुपये निधी मंजूर केला आहे. यंदाच्या मान्सून काळात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं बाधित झालेल्या नागरिकांना तत्काळ मदत आणि पुनर्वसनासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाज माध्यमावरून ही बातमी दिली. या मदतीसाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले आहेत. ही अग्रिम मदत असून अंतिम मदत प्राप्त करण्यासंदर्भातील प्रक्रिया अजून सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**अयोध्या दीपोत्सव**

दीपावलीनिमित्त उत्तरप्रदेशात अयोध्या नगरीत शरयू नदीच्या किनाऱ्यावर काल भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. राम की पौडीसह शरयू नदीवरील 56 घाटांवर 26 लाखांपेक्षा जास्त पणत्या प्रज्वलित करून नवा गिनीज विश्वविक्रम नोंदवण्यात आला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी दोन हजाराहून अधिक वेदाचार्यांनी शरयू नदीच्या काठावर महाआरती केली. या सोहळ्यात रामायणावर आधारित नृत्य आणि लेजर शो देखील झाला.

**शुभेच्छा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन् यांनी दिवाळीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. दीपावलीचा हा सण अंध:कारावर प्रकाशाचा, अज्ञानावर ज्ञानाच्या आणि अर्धमावर धर्माच्या विजयाचं प्रतिक आहे. देशाच्या विविध भागांमध्ये उत्साहानं साजरा केला जाणारा हा सण प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**दीपावली**

राज्यात सर्वत्र दीपोत्सवाचा उत्साह दिसत आहे. आज नरकचतुर्दशीला पहाटे अभ्यंगस्नान, देवदर्शन केल्यानंतर चविष्ट फराळाची लगबग घरोघरी दिसत आहे. आकाशकंदील, पणत्या आणि दिव्यांची रोषणाई याबरोबरच लहानग्यांनी केलेले मातीचे किल्ले लक्ष वेधून घेत आहेत. बाजारपेठामध्येही चैतन्याचं वातावरण आहे. दिवाळीच्या निमित्तानं सर्वत्र सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही पाहायला मिळत आहे. यंदाच्या दिवाळीवर मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टिचं सावट आहे, या अतिवृष्टीग्रस्तांची तसंच वंचित घटकांची दिवाळी गोड करण्यासाठी अनेक सामाजिक उपक्रमांचं आयोजनही करण्यात येत आहे. ऐकुया अधिक वृत्तांत....

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमीच्यावतीनं काल 'दिवाळी पहाट-दीपबंध सुरांचा' हा भावगीत आणि भक्तीगीतांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. नांदेडमध्ये जिल्हा प्रशासन, गुरुद्वारा बोर्ड, महानगरपालिका आणि नागरी सांस्कृतिक समितीनं आजपासून तीन दिवस दिवाळी पहाट कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.**

**पुण्यातल्या 'दुर्गम प्रतिष्ठान' संस्थेच्या वतीनं राजगड तालुक्यातील आठरा गाव मावळ परिसरातील गावांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाना महिनाभर पुरेल अशा किराणा मालासह दिवाळी फराळ, तसंच शालेय साहित्याचं वाटप करण्यात आलं.तसंच साईनाथ मंडळ ट्रस्ट आणि अजिंक्य मित्र मंडळाच्यावतीनं पुणे जिल्ह्यातल्या मुळशी तालुक्यातील कोळवण परिसरातील गांवांमधील आदिवासी पाड्यांतील कुटुंबांना दिवाळी फराळाचं वाटप करण्यात आलं. याशिवाय मराठवाड्यातील पूरग्रस्त भागातील मुलामुलींसाठी सहाय्यता**

**निधी उभारण्यासाठी 'तीन भारतरत्न', या सांगीतिक मैफलीचं आयोजन काल पुण्यात करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाच्या माध्यमातून एक लाख 51 हजारांचा मदत निधी उभारण्यात आला.**

**ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय आणि सर्व प्रांत आणि तहसिल कार्यालय यांनी दिवाळी फराळ कार्यक्रमाबरोबरच 'एक हात पूरग्रस्तांच्या मदतीकरिता' याअंतर्गत 'माणूसकीची दिवाळी' हा उपक्रम राबविला. यावेळी अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी "मुख्यमंत्री सहायता निधी" कक्षामध्ये स्वेच्छा निधी जमा केला.**

**सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या संकल्पनेतून 'एक दिवा सैनिकांसाठी' या कार्यक्रमाचं काल आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात जिल्ह्यातील अनेक वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, माजी सैनिकांना दिवाळी फराळ वाटप करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वीर पत्नी शांता बागडे आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाल्या.....**

***आज एक दिवस सैनिकासाठी कलेक्टर साहेबांनी जे चालू केला. एकोणीसशे बाहत्तर ची मी वारविधवा आहे. पण बाहत्तर पासून मी पाहिलं पण कधी सुद्धा असा कार्यक्रम आगळा वेगळा झाला नव्हता. आमचे सांगली जिल्ह्यातले सैनिक. एकतीस हजार सैनिक आहेत पण कधीही एकत्रित आले नव्हते, आणि कुठल्याही अधिकाऱ्यांनी बोलावले नव्हते. पण चवदार साहेब आणि कलेक्टर साहेबांनी सहकार्य करून वीरपत्नी वीर माता आणि वीरपिता आणि आमचे असणारे आजी माजी सैनिक एकत्रित करून एक दिवस सैनिकासाठी म्हणून सैनिकांना फराळासाठी एकत्रित दिवाळी केली. आज दिवाळी आनंदाची वाटली. मी एकोणीसशे एक्काहत्तर पासून आज दिवाळी मी कधी केलेली नाही, पण आज सगळ्या बंधू बहिणींच्या सहवासात मी दिवाळी साजरी केली.***

**दीपोत्सवात विविध संस्था संघटनांकडून जपलं जाणारं हे सामाजिक भान मनामनात तेजाची ज्योत प्रज्वलित करेल, हे नक्की... आमच्या ठिकठिकणच्या वार्ताहरांसह योगेश रांगणेकर पुणे**

**चंद्रयान**

चांद्रयान-2 नं आपल्या वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्यानं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या 'कोरोनल मास इजेक्शन' चा चंद्रावर पडणारा प्रभाव पहिल्यांदाच टिपला आहे. विज्ञान क्षेत्रातलं हे ऐतिहासिक यश असल्याचं भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं म्हणजेच इस्रोनं म्हटलं आहे. चांद्रयान-2 नं टिपलेल्या नोंदींमुळे चंद्राचं बाह्य क्षेत्र, चंद्रावरचं विरळ वातावरण आणि त्याच्या पृष्ठभागावर होणारा अवकाशातल्या हवामानाचा प्रभाव समजून घ्यायला मदत होईल, असं इस्रोनं म्हटलं आहे. 22 जुलै 2019 रोजी श्रीहरीकोटा इथून प्रक्षेपित करण्यात आलेल्या चांद्रयान-2 नं, 20 ऑगस्ट 2019 रोजी, चंद्राभोवतालच्या लंबवर्तुळाकार कक्षेत यशस्वीपणे प्रवेश केला होता. 7 सप्टेंबर 2019 रोजी चंद्रावर उतरण्याच्या प्रयत्नादरम्यान यानाचा विक्रम लँडरशी संपर्क तुटला होता, तरी ते पूर्णपणे कार्यरत असल्याचं इस्रोनं म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री**

महायुतीचं सरकार येताच ओबीसी मंत्रालयाची स्थापना केली तसंच ओबीसींच्या प्रगतीसाठी विविध योजना सुरू केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाज्योती अर्थात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन तसंच कोनशीलेचं अनावरण काल नागपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. राज्य सरकारने ओबीसीसाठी सुरू केलेल्या विविध योजनांचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. सरकारने आतापर्यंत महाज्योतीला मोठ्या प्रमाणात निधी दिला, तसंच वसतीगृहं सुरू केली, आर्थिक विकास महामंडळं बळकट केली असं मुख्यमंत्री म्हणाले.

**विरोधक**

मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्यात या मागणीसाठी येत्या एक नोव्हेंबर रोजी मुंबईत विरोधी पक्षांचा मोर्चा काढण्यात येणार आहे. खासदार संजय राऊत यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. मुंबईतल्या मोर्चात राज्यभरातून लोक येतील, या मोर्चात ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज ठाकरे सहभागी होतील, असं राऊत यांनी सांगितलं.

दरम्यान मुंबईतील गोरेगाव इथं काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मुंबई महानगर प्रदेश मतदार यादी प्रमुख मेळावा झाला. राज्यातल्या मतदार यादीत 96 लाख बनावट मतदार असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी यावेळी केला. मतदार यादीतील त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नयेत या मागणीचा पुनरूच्चार ठाकरे यांनी केला.

**रक्कम बेवारस-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आठ तालुक्यातल्या ग्रामीण भागातल्या विविध बँकांमध्ये 62 कोटी रुपये रक्कम बेवारस स्थितीत पडून आहे. त्यामुळे ग्राहकांनी आवश्यक कागदपत्र सादर करून पैसे घेऊन जावेत, असं आवाहन सिंधुदुर्ग जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक ऋषिकेश गावडे यांनी केलं आहे.

**रेल्वे-सिंधुदुर्ग**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विन कुमार वैष्णव यांनी लांब पल्ल्याच्या चार गाड्यांना सिंधुदुर्ग-ओरोस आणि कणकवली रेल्वे स्थानकांवर थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी यासंदर्भात मागणी केली होती.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या मर्यादित षटकांच्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर 7 गडी राखून मात केली. पावसाच्या व्यत्ययामुळे सामना चार वेळा थांबवण्यात आला. त्यामुळे सामना प्रत्येकी 26 षटकांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रथम फलंदाजी करताना भारताने 26 षटकांत नऊ बाद 136 धावा केल्या. डकवर्थ-लुईस नियमानुसार ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी 131 धावांचं लक्ष्य होतं. ही लक्ष्य ऑस्ट्रेलियानं 22व्या षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं. या विजयामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियानं 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

**महिला-क्रिकेट**

महिलांच्या क्रिकेटमध्ये, इंदूरच्या होळकर मैदानावर आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडच्या संघानं काल भारताचा 4 धावांनी पराभव केला. इंग्लंडनं दिलेल्या 289 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला 50 षटकांत 6 बाद 284 धावाच करता आल्या. हीथर नाईटला सामनावीराचा किताब मिळाला. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर निर्धारित 50 षटकांत 8 गडी गमावून 288 धावा केल्या.

**हवामान**

राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.